शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## विद्यार्थ्यांच्या गर्दीत ‘गुप्त’ मुक्काम; दाढीच्या आड लपलेल्या आरोपीला आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने केले गजाआड

**जालना - प्रतिनिधी**

आभासी चलन आणि मध्ये मोठ्या आर्थिक परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांकडून तब्बल ४ कोटी ३० लाख ६६ हजार ७९५ रुपयांची गुंतवणूक करून घेतल्याचा आरोप असलेल्या आणि महाराष्ट्र व कर्नाटकातील गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या आरोपीला जालना आर्थिक गुन्हे शाखेने कोल्हापूर जिल्ह्यातून अटक केली. अमोद वसंत म्हेतर (वय ५०, रा. इचलकरंजी, जि. कोल्हापूर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

जागतिक पातळीवर बिटकॉइनसह आभासी चलनातील वाढत्या गुंतवणुकीचा फायदा घेत काही व्यक्तींनी प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या आणि या आभासी चलनांमध्ये मोठा आर्थिक लाभ मिळेल, असे आमिष दाखविल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या आमिषाला बळी पडून फिर्यादी, त्यांचे नातेवाईक आणि मित्रपरिवारातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. मात्र, गुंतवणुकीची रक्कम घेतल्यानंतर संबंधित आरोपी पसार झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.




**सव्वाचार कोटींच्या गुंतवणुकीचा अपहार केल्याचा आरोप**

या प्रकरणी १८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्राप्त तक्रारीवरून तालुका जालना पोलीस ठाण्यात अमोद वसंत म्हेतर, इरफान सय्यद मोयोददीन, व्यंकटेश दशरथ भोई, रमेश उत्तेकर, अजय गायकवाड आणि शर्वरी अमोद म्हेतर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी वेळोवेळी खोटी आश्वासने देऊन फिर्यादी व त्यांच्या परिचितांकडून ४,३०,६६,७९५ रुपये गुंतवणूक करून घेतली आणि या रकमेचा अपहार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ४४१/२०२५ अन्वये भादंवि कलम ४२०, ४०६, ४०९, १२०(ब) तसेच कायद्यातील कलम ३, ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**ओळख लपवून भाड्याच्या खोलीत वास्तव्य**

या प्रकरणातील आरोपी अमोद म्हेतर याच्याविरुद्ध यापूर्वी जालना तालुका पोलीस ठाण्यात (क्रिप्टो करन्सी) संदर्भातील प्रकरणातही गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात आरोपींना यापूर्वी अटक झाली होती. त्याचबरोबर महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातही आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल असून काही आरोपी फरार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.



तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमोद म्हेतर याचा शोध सुरू केला. तो तळसंदे गावात आपली ओळख लपवून राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तळसंदे परिसरात महाविद्यालय असल्याने मोठ्या संख्येने विद्यार्थी भाड्याच्या खोल्यांमध्ये राहत असल्याचा फायदा घेत आरोपीने तेथे खोली भाड्याने घेतली होती. ओळख लपविण्यासाठी त्याने दाढी वाढवून वास्तव्य केल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

**स्थानिक पोलिसांच्या मदतीने अटक**

वरिष्ठांची परवानगी घेत आर्थिक गुन्हे शाखेचे पथक कोल्हापूरकडे रवाना झाले. वडगाव पोलिसांच्या स्थानिक मदतीने पथकाने कारवाई करत अमोद म्हेतर याला २० ऑगस्ट २०२६ रोजी वडगाव पोलीस ठाणे परिसरातून ताब्यात घेत अटक केली. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने सहा दिवसांची पोलीस कोठडी () मंजूर केली. या काळात आर्थिक व्यवहार, गुंतवणूकदारांकडून घेतलेली रक्कम, व च्या माध्यमातून करण्यात आलेले व्यवहार तसेच या प्रकरणातील इतर आरोपींचा सहभाग याबाबत तपास केला जाणार आहे.

**क्रिप्टो फसवणुकीच्या पीडितांना पुढे येण्याचे आवाहन**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेने केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेष म्हस्के, गोकुळसिंग कायटे, किरण चव्हाण, समाधान तेलंग्रे, विष्णू कोरडे, ज्ञानोबा खुणे आणि श्रेयश वाघमारे यांच्या पथकाने ही कारवाई केली. दरम्यान, क्रिप्टो करन्सी किंवा आभासी चलनाच्या नावाखाली आर्थिक फसवणूक झालेल्या नागरिकांनी पुढे येऊन आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध तसेच आर्थिक व्यवहारांची साखळी उलगडण्याचा तपास सुरू आहे.

## चिंचोलीत १३ वर्षीय बालकाची वेठबिगारीतून सुटका; शेतमालकाविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश

### चाइल्ड हेल्पलाइनच्या गोपनीय माहितीनंतर प्रशासनाची धाड; शेतीकाम व बकऱ्या सांभाळण्यास भाग पाडल्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील मौजे चिंचोली येथे एका १३ वर्षीय अल्पवयीन बालकाकडून बळजबरीने शेतीकाम करून घेत त्याचा शारीरिक व मानसिक छळ केला जात असल्याचा गंभीर प्रकार जिल्हा प्रशासनाच्या कारवाईत उघडकीस आला आहे. चाइल्ड हेल्पलाइन १०९८, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीनंतर महसूल, पोलीस, कामगार विभाग तसेच महिला व बाल संरक्षण कक्षाच्या संयुक्त पथकाने धाड टाकून बालकाची सुटका केली.

सुटका करण्यात आलेला बालक हा मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यातील हरसूद येथील रहिवासी असून त्याचे वय अंदाजे १३ वर्षे आहे. त्याचे वडील एका गुन्ह्यात शिक्षा भोगत असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. बालकाची सावत्र आई ज्या शेतमालकाकडे राहत होती, त्या शेतमालकाने बालकाच्या वडिलांना काही रक्कम दिल्याचा दावा केला होता. बालकाची आजी त्याचा ताबा मागण्यासाठी गेल्यानंतर संबंधित शेतमालकाने पैसे परत मिळेपर्यंत बालकाला सोडणार नसल्याची भूमिका घेतल्याचे प्रशासनाच्या प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. त्यानंतर बालकाला चिंचोली शिवारातील शेतावर ठेवून त्याच्याकडून सक्तीने शेतीची कामे तसेच बकऱ्या सांभाळण्याचे काम करून घेतले जात असल्याचा आरोप आहे.

या काळात त्याचा शारीरिक व मानसिक छळ झाल्याचेही प्रशासनाने म्हटले आहे.

**संयुक्त पथकाची धाड; बालकाची सुटका**

चाइल्ड हेल्पलाइनकडून माहिती मिळताच जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विभागांचे संयुक्त पथक चिंचोली शिवारात दाखल झाले. कारवाईदरम्यान बालकाची बळजबरीच्या कामातून मुक्तता करण्यात आली.

बाल कल्याण समिती, जालना यांच्या आदेशानुसार बालकाला शासकीय बालगृह, जालना येथे दाखल करण्यात आले आहे. त्याचा जबाब बालस्नेही पद्धतीने नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, त्याच्या सुरक्षिततेसह पुनर्वसनाची कार्यवाही केली जात आहे.

**शेतमालकाची निश्चिती व पुरावे संकलित करण्याचे आदेश**

या प्रकरणाची *(पान २ वर)*

## सटवाई तांड्याच्या रहिवाशांच्या हक्कांसाठी मनसे आक्रमक

### जागा नियमितीकरणासह घरकुलासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे क्रमांक ४८८, सटवाई तांडा येथील मागील ५० ते ६० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जागा नियमित करून त्यांना हक्काचे घरकुल उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासंदर्भात गुरुवारी (दि. २० ऑगस्ट) जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले.



सटवाई तांडा येथील नागरिक शासकीय जमिनीवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असून, जागा नियमित करण्यासाठी तसेच घरकुल योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाकडे वेळोवेळी अर्ज व निवेदने देत आहेत. मात्र, अद्याप या प्रश्नावर ठोस निर्णय झालेला नसल्याचा दावा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

शासन निर्णयानुसार शासकीय अतिक्रमित जमिनीचे सर्वेक्षण करून पात्र रहिवाशांची निश्चिती करावी आणि नियमानुसार संबंधित जागा नियमित करून नागरिकांना त्यांच्या हक्काचे घरकुल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

**प्रशासनाने तातडीने सर्वेक्षण करण्याची मागणी**

सर्व्हे क्रमांक ४८८ येथील रहिवाशांच्या वास्तव्यासंदर्भात प्रशासनाने प्रत्यक्ष सर्वेक्षण करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. अनेक वर्षांपासून तेथे राहणाऱ्या पात्र नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, नागरिकांनी अनेक वर्षांपासून आपल्या हक्कासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला आहे. त्यामुळे आता प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून नागरिकांना दिलासा द्यावा.

**प्रश्न न सुटल्यास आंदोलनाचा इशारा**

सटवाई तांडा येथील रहिवाशांच्या जागा नियमितीकरणाचा आणि घरकुलाचा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास महाराष्ट्र नवनिर्माण *(पान २ वर)*

## जलसंधारणासाठी जालन्यात एकजूट; ‘महा वॉकेथॉन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद





### विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह विविध क्षेत्रातील नागरिकांचा सहभाग


**जालना । प्रतिनिधी**

जलसंधारणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारण दिनानिमित्त जालना शहरात आयोजित करण्यात आलेल्या ‘महा वॉकेथॉन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हाधिकारी कार्यालयापासून पोलीस मैदानापर्यंत झालेल्या ३.१ किलोमीटरच्या या वॉकेथॉनमध्ये शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच शासकीय-निमशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसह विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महापौर वंदना मगरे आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत सहभागी नागरिकांनी जलसंधारणाची शपथ घेतली. त्यानंतर हिरवा झेंडा दाखवून ‘महा वॉकेथॉन’ला सुरुवात करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयापासून सुरू झालेला वॉकेथॉन घाटी हॉस्पिटल, सत्कार कॉम्प्लेक्स, अंबड चौफुली मार्गे पोलीस मैदान येथे पोहोचला. सहभागी नागरिकांनी उत्साहात ३.१ किलोमीटरचे *(पान २ वर)*

## किडनीग्रस्त रुग्णासाठी आमदार बबनराव लोणीकरांची तातडीने मदत

### सिव्हिल सर्जन गाडेकर यांना काळजीपूर्वक उपचार करण्यासाठी सूचना



**जालना - प्रतिनिधी**

भाटेपुरी येथील अंकुश हरिभाऊ कचरे (वय ३० वर्षे) हे किडनीच्या गंभीर आजाराने त्रस्त असून त्यांना आवश्यक असलेली - (कावीळ-) लस तसेच पुढील उपचार तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करण्यात आले. यासंदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांचे स्वीय सहाय्यक बाबा आटोळे यांनी स्वतः जिल्हा रुग्णालयात जाऊन सिव्हिल सर्जन डॉ. गाडेकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी रुग्णाची परिस्थिती सिव्हिल सर्जन यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आटोळे यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सिव्हिल सर्जन डॉ. गाडेकर यांचे त्यांच्याशी थेट बोलणे करून दिले. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी संबंधित रुग्णाची अतिशय काळजीपूर्वक तपासणी करून तातडीने आवश्यक ते सर्व उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. आमदारांच्या सूचनेनंतर सिव्हिल सर्जन डॉ. गाडेकर यांनी *(पान २ वर)*

# संपादकीय...

## राजकारण असावे, पण जालन्याच्या हिताचे

जालना शहर महानगरपालिकेतील ९९३ मंजूर पदांच्या सेवाप्रवेश व सेवा वर्गीकरण नियमांना राज्य शासनाने मंजुरी दिल्यानंतर जालना शहरातील राजकारण पुन्हा एकदा श्रेयवादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या समर्थकांकडून हा निर्णय त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित असल्याचा दावा केला जात आहे, तर भाजपकडून महापालिका निर्मितीला पूर्वी विरोध करणाऱ्यांनी आता पदभरतीच्या निर्णयाचे श्रेय घेऊ नये, असा पलटवार करण्यात आला आहे. मुळात हा वाद केवळ ९९३ पदांचा नाही. हा वाद जालना महानगरपालिका नेमकी कोणाच्या राजकीय इच्छाशक्तीमुळे सक्षम होणार, याचा नाही; तर महानगरपालिका निर्माण झाल्यानंतर ती प्रत्यक्षात सक्षम करण्यासाठी कोण किती गंभीर आहे, याचा आहे.

महापालिका स्थापन झाली. आकृतिबंध मंजूर झाला. आता सेवा प्रवेश नियमांनाही मंजुरी मिळाली. या तिन्ही प्रक्रिया स्वतंत्र प्रशासकीय टप्पे आहेत. त्यामुळे प्रत्येक टप्प्याचे श्रेय एखाद्या एका राजकीय व्यक्तीला देणे किंवा संपूर्ण निर्णयाचे श्रेय एका पक्षाने घेणे, हे वस्तुस्थितीचे अतिसुलभीकरण ठरेल.

११ सप्टेंबर २०२५ रोजी जालना महानगरपालिकेसाठी ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता. म्हणजेच किती मनुष्यबळ आवश्यक आहे, याची शासनस्तरावर चौकट आधीच निश्चित झाली होती.

मात्र, आकृतिबंध मंजूर होणे आणि त्या पदांवर प्रत्यक्ष भरती होणे यात मोठा फरक आहे. पदांची निर्मिती झाली म्हणून लगेच जाहिरात काढता येत नाही. संबंधित सेवा प्रवेश नियम, पदांची पात्रता, नियुक्तीची पद्धत, संवर्गनिहाय व्यवस्था आणि इतर प्रशासकीय बाबींना मान्यता आवश्यक असते.

१९ ऑगस्ट २०२६ रोजी सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियमांना शासनाने मंजुरी दिल्यामुळे आता या प्रक्रियेतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे या निर्णयाचे खरे महत्त्व 'भरतीला परवानगी' एवढेच नसून महापालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेला कायदेशीर आणि संस्थात्मक चौकट मिळणे, हे आहे.

आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्यामुळे निर्णय झाला, असा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे. शासनाच्या पातळीवर एखादा प्रस्ताव पुढे नेण्यासाठी लोकप्रतिनिधी पाठपुरावा करतात, बैठका घेतात, संबंधित मंत्र्यांकडे मागणी करतात आणि प्रशासनाला गती देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे पाठपुरावा केला असेल तर त्याचे श्रेय घेणे हे राजकारणात अनोखे नाही.

पण येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतोपाठपुरावा नेमका कोणत्या टप्प्यावर झाला आणि शासनाचा निर्णय कोणत्या प्रशासकीय प्रक्रियेतून झाला?

याचे अधिकृत दस्तऐवज, पत्रव्यवहार आणि कालानुक्रमिक माहिती सार्वजनिक झाली तर श्रेयवादाला वस्तुनिष्ठ आधार मिळू शकतो. अन्यथा 'माझ्यामुळे झाले' आणि 'त्यांच्यामुळे झाले नाही' या दोन दाव्यांमध्ये जालनेकरांचे मूळ प्रश्न बाजूला पडतील.

दुसरीकडे भाजप नेत्यांनी उपस्थित केलेला प्रश्नही राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे. महापालिका निर्मितीच्या काळात जर एखाद्या नेत्याने तिच्या स्थापनेला विरोध केला असेल, कर वाढीबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली असेल किंवा महानगरपालिका व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले असतील, तर आज त्याच व्यवस्थेतील पदभरतीच्या निर्णयाचे श्रेय घेताना त्या पूर्वीच्या भूमिकेचे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

परंतु येथेही भाजपने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

महापालिका स्थापन करण्याचा निर्णय झाल्यानंतर तिच्या सक्षमतेची जबाबदारी सत्ताधारी पक्षाचीही आहे. त्यामुळे विरोधक पूर्वी काय म्हणाले याची आठवण करून देण्यापेक्षा सत्ताधाऱ्यांनी आता ९९३ पदांची भरती किती पारदर्शक, वेगवान आणि गुणवत्ताधारित पद्धतीने केली जाते, यावर लक्ष केंद्रित करणे अधिक योग्य ठरेल. जालना महानगरपालिका निर्माण झाली असली तरी प्रशासनाचा विस्तार त्या प्रमाणात झाला आहे का, हा खरा प्रश्न आहे.

महापालिकेचे काम केवळ कार्यालयीन फाईल्सपुरते मर्यादित नाही. पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, बांधकाम परवानग्या, नगररचना, कर आकारणी व वसुली, आरोग्य, अग्निशमन, उद्याने, अतिक्रमण, सार्वजनिक बांधकाम अशा असंख्य जबाबदाऱ्या महापालिकेवर आल्या आहेत.

जर या विभागांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसेल, तर नागरिकांकडून कितीही मोठ्या अपेक्षा ठेवणे अवास्तव आहे.

आज जालनेकरांना सर्वाधिक गरज आहे ती कार्यालयात फाईल किती दिवस पडून राहते यापेक्षा काम किती लवकर होते याची.

या पदभरतीकडे जालना जिल्ह्यातील हजारो बेरोजगार तरुण आशेने पाहत असतील. त्यामुळे पुढील टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. पदनिहाय रिक्त जागा, आरक्षण, शैक्षणिक पात्रता, भरतीची पद्धत, परीक्षा किंवा निवड प्रक्रिया आणि वेळापत्रक स्पष्टपणे जाहीर झाले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप, शिफारस किंवा अपारदर्शकता निर्माण होऊ नये.

ज्या पदांसाठी शासनाने नियम तयार केले आहेत, त्या पदांवर गुणवत्तेच्या आधारेच नियुक्त्या झाल्या पाहिजेत. कारण आज श्रेय घेण्यासाठी राजकीय नेते पुढे येतील; पण उद्या महापालिकेची कार्यक्षमता तपासली जाणार आहे ती नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कामावर. जालना शहराला महानगरपालिका दर्जा मिळणे ही केवळ नावातील किंवा प्रशासकीय बदलाची बाब नाही. त्यासोबत नागरिकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. महापालिकेला मोठे उत्पन्न, मोठे अनुदान आणि मोठे अधिकार मिळत असतील, तर त्याच प्रमाणात उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली पाहिजे. ९९३ पदांची भरती ही त्या दिशेने पहिली मोठी पायरी ठरू शकते. मात्र, केवळ कर्मचारी वाढवून उपयोग नाही. योग्य विभागात योग्य मनुष्यबळ, कामाचे मोजमाप, डिजिटल प्रशासन, नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. आज जालना शहरातील तरुणांना एकच प्रश्न पडला आहे'भरती कधी सुरू होणार?'खोतकरांचा पाठपुरावा होता की नाही, भाजपचा हस्तक्षेप किती होता, मुख्यमंत्री कार्यालयाने कोणते निर्देश दिले, नगरविकास विभागाने कोणत्या प्रक्रियेतून मंजुरी दिली, हे सर्व राजकीयदृष्ट्या चर्चेचे विषय असू शकतात. पण बेरोजगार तरुणांसाठी त्यापेक्षा महत्त्वाचे आहे की शासनाने आता पुढील प्रक्रिया किती वेगाने पूर्ण करणार. म्हणूनच या निर्णयाचे श्रेय घेण्यासाठी राजकीय शक्ती खर्च करण्यापेक्षा ९९३ पदांच्या भरतीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे दबाव आणणे, ही खरी जालन्याची गरज आहे.

# मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना थांबणार कधी?

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे एका अल्पवयीन शाळकरी मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची संतापजनक घटना नुकतीच घडली. या घटनेने पुणे जिल्हाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा पुन्हा एकदा प्रश्नांकित झाली आहे. एका निष्पाप मुलीचे आयुष्य अशा प्रकारे संपवले जाणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे.

महाराष्ट्रात अशा घटना घडण्याची ही पहिलीच वेळ नाही. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र दिनी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका चार वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. त्याच दिवशी चाकणजवळील महाळुंगे येथे एका अल्पवयीन मुलावर गंभीर लैंगिक अत्याचार करून त्याची हत्या झाल्याची घटना समोर आली होती. या दोन्ही घटनांनी महाराष्ट्र हादरून गेला होता. त्याआधी बदलापूरमधील शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या घटनेनेही राज्याच्या विवेकाला धक्का दिला होता. कोपर्डीची घटना तर आजही महाराष्ट्राच्या स्मरणात आहे.

पिंपळवंडी, नसरापूर, महाळुंगे, बदलापूर आणि कोपर्डी या घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असल्या तरी त्यामागील विकृत मानसिकता आणि समाजासमोरील प्रश्न समान आहेत. या घटना केवळ गुन्हेगारीच्या घटना म्हणून पाहून चालणार नाही. महिला आणि बालकांच्या सुरक्षेबाबत आपण कुठे कमी पडत आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

पिंपळवंडीतील घटनेनंतर संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी होत आहे. पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक केल्याने तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असले तरी नागरिकांचा संताप स्वाभाविकपणे कायम आहे. अशा प्रकरणांत आरोपीला अटक होणे ही सुरुवात आहे; न्याय मिळणे ही अंतिम कसोटी आहे. तपास निष्पक्ष, जलद आणि पुराव्यांवर आधारित असला पाहिजे आणि दोष सिद्ध झाल्यास आरोपीला कायद्यानुसार कठोर शिक्षा झाली पाहिजे.

मात्र प्रत्येक वेळी घटना घडल्यानंतर आरोपीला अटक करणे, चौकशीचे आदेश देणे आणि कठोर शिक्षेची घोषणा करणे एवढ्यावरच शासनाची जबाबदारी संपत नाही. अशा घटना घडूच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. पोलिसांनी संवेदनशील भागात गस्त वाढवणे, शाळा व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, बालसुरक्षा यंत्रणा सक्षम करणे आणि महिलांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे.

पिंपळवंडी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी गंभीर गुन्ह्यांत आरोपी असलेल्या व्यक्तींवर कायदेशीर प्रक्रियेनुसार योग्य देखरेख आणि प्रतिबंधात्मक उपाय झाले होते का, याचाही तपास झाला पाहिजे. गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींकडून पुन्हा गुन्हा घडू नये यासाठी संबंधित यंत्रणांनी काय उपाय केले, याची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे. एखाद्या यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या निष्पाप जीवाला किंमत मोजावी लागली असेल, तर त्या निष्काळजीपणावरही कठोर कारवाई झाली पाहिजे.

कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी शिक्षा निश्चित होणे आणि ती वेळेत होणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र केवळ कठोर शिक्षा हा या समस्येवरील एकमेव उपाय नाही. महिलांकडे आणि मुलींकडे व्यक्ती म्हणून नव्हे, तर उपभोग्य वस्तू म्हणून पाहणारी विकृत पुरुषी मानसिकता बदलणे तितकेच गरजेचे आहे. घर, शाळा आणि समाज या तिन्ही पातळ्यांवर मुलांना स्त्रीचा सन्मान, समानता, संमती आणि मानवी प्रतिष्ठेचे संस्कार दिले पाहिजेत.

शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरांच्या विचारांनी समृद्ध झालेल्या महाराष्ट्रात महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार निर्माण होणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. तीन-चार वर्षांच्या चिमुरडीपासून ते वृद्ध महिलेपर्यंत कोणतीही महिला किंवा मुलगी असुरक्षित वाटत असेल, तर आपण पुरोगामी असल्याचा दावा कितपत योग्य आहे, याचा विचार समाजाने करायला हवा. शाळा, महाविद्यालये, कामाची ठिकाणे, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक ठिकाणे आणि घराच्या आसपास महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे ही सरकारचीच नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. महिला सुरक्षेसाठी केवळ कायदे करून उपयोग नाही; त्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणीही झाली पाहिजे.

महाराष्ट्राची तुलना कोणत्याही राज्याशी करून आपली जबाबदारी झटकता येणार नाही. उलट महाराष्ट्राने महिला आणि बालसुरक्षेचे देशासमोर आदर्श उदाहरण निर्माण करणे गरजेचे आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपीला शिक्षा मिळणे आवश्यक आहेच; पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे गुन्हा घडण्यापूर्वी तो रोखणे.

पिंपळवंडीतील निष्पाप मुलीला गमावल्याचे दुःख केवळ तिच्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचे आहे. अशा प्रत्येक घटनेनंतर संताप व्यक्त करून काही दिवसांनी सर्व विसरून जाण्याची मानसिकता आता बदलली पाहिजे. या घटनांच्या मुळाशी जाऊन विकृत मानसिकता, कायद्याची अंमलबजावणी आणि सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. महाराष्ट्र खऱ्या अर्थाने पुरोगामी तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा या भूमीवर जन्मलेली प्रत्येक मुलगी निर्भयपणे शाळेत जाईल, सुरक्षितपणे घरी परतेल आणि प्रत्येक महिला सन्मानाने जगू शकेल. मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना थांबविण्यासाठी सरकार, पोलीस, न्यायव्यवस्था आणि समाजाने आता केवळ आश्वासने नव्हे, तर ठोस कृती करण्याची वेळ आली आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**
**९९२२५४६२९५**

## पान १ वरुन...

### चिंचोलीत १३ वर्षीय...

सखोल चौकशी करून दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भोकरदन यांना देण्यात आले आहेत.

उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना गुन्ह्याचा तपास, संबंधित शेतमालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई, जप्तीची कार्यवाही, जबाब नोंदविणे तसेच अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटशी समन्वय साधण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तहसीलदारांना चिंचोली येथील ७/१२ उतारे व अन्य महसुली अभिलेखांच्या आधारे संबंधित शेतमालकाची निश्चिती, स्थळ पाहणी व आवश्यक दंडाधिकारी सहाय्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कामगार विभागाला किमान वेतन, थकीत मजुरी तसेच बालकामगार प्रतिबंधक कायद्यानुसार आवश्यक कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे.

**वेठबिगारी, बालमजुरीप्रकरणी फौजदारी कारवाई**

या प्रकरणात वेठबिगार कामगार पद्धती (निर्मूलन) अधिनियम, १९७६, बाल न्याय अधिनियम, २०१५ तसेच बालमजुरीसंदर्भातील लागू कायद्यांनुसार कठोर फौजदारी कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बालकाला बेकायदेशीररीत्या ताब्यात ठेवणे, सक्तीने काम करून घेणे, अग्रिम रक्कम किंवा मजुरीच्या व्यवहाराचा संबंध आणि छळाचे स्वरूप याबाबत पुरावे संकलित केले जात आहेत.

दरम्यान, जिल्ह्यात कोठेही अल्पवयीन मुलांकडून बालमजुरी, वेठबिगारी किंवा बळजबरीने काम करून घेतले जात असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालय (०२४८२-२२५५०२) किंवा चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या क्रमांकावर संपर्क साधावा. बालमजुरी आणि वेठबिगारी हा गंभीर अपराध असून, अशा प्रकारांना पाठीशी घालणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे.

### सटवाई तांड्याच्या..

सेना आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने जनआंदोलन व धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे जालना उपशहर अध्यक्ष बाळू जवाहरलाल जाधव यांनी दिला. या वेळी मनसेचे उपशहर अध्यक्ष बाळू जवाहरलाल जाधव, भारतीय बहुजन क्रांती संघाचे अध्यक्ष चतुरसिंग भागाजी गोफणे, सामाजिक कार्यकर्ते जयपाल सवाईराम राठोड, रमेश उत्तम चव्हाण, मुकुंददराव चक्रधर झरेकर, कृष्णा भालेराव, चैतनभाऊ राठोड यांच्यासह सटवाई तांडा येथील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शांताबाई रमेश पवार, जया बाळू जाधव, भागुजी पवार, छाया अशोक पवार, रवि डोंगरसिंग पवार, सुनिता पवार, सुरेखा पवार, संगिता जाधव, कलाबाई बिडे, नैनसिंग रूपसिंग बिडे, प्रेमसिंग नैनसिंग बिडे, रोशन पदमसिंग गुर्जर आदी नागरिकांचीही उपस्थिती होती.

### जलसंधारणासाठी...

अंतर पूर्ण केले. या मार्गावर जलसंधारणाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा देत पाणी बचत, पाण्याचा काटकसरीने वापर आणि जलसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. मृद व जलसंधारण विभागाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता श्रावण उदयभान शेंडे, कार्यालयीन अधीक्षक के. एस. जावळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते. पोलीस मैदानावर वॉकेथॉनचा समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि महापौर वंदना मगरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविण्यासोबतच उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यामध्ये योगदान देण्याची गरज आहे. पाण्याचे संवर्धन आणि बचतीचा संदेश घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा जनजागृती उपक्रमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**लकी ड्रॉमधून दहा विजेत्यांना बक्षिसे**

वॉकेथॉनमध्ये सहभागी झालेल्यांसाठी लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. त्यातून दहा विजेत्यांची निवड करून त्यांना बक्षिसे देण्यात आली. तसेच जिल्ह्यात जलसंधारणाबाबत जनजागृती आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्या जलदूतांचा, विविध सेवाभावी संस्थांचा तसेच रोटरी क्लब, जालना यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. शांती निकेतन विद्यामंदिर, जिल्हा परिषद क्रीडा प्रबोधिनी, मत्स्योदरी कॉलेज, शासकीय नर्सिंग कॉलेज, जेईएस महाविद्यालय यांच्यासह शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांनीही वॉकेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जलसंधारणाचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या संकल्पाने कार्यक्रमाची सांगता झाली. सहभागी विद्यार्थी, नागरिक आणि उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था व व्यक्तींचे महापौर वंदना मगरे आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आभार मानले.

### किडनीग्रस्त रुग्णासाठी...

तातडीने संबंधित डॉक्टरांची बैठक घेऊन रुग्णाला रुग्णालयात दाखल करून आवश्यक त्या सर्व तपासण्या करण्याच्या सूचना दिल्या. तसेच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार - लस उपलब्ध करून देणे आणि आवश्यक असल्यास डायलिसिसची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. दरम्यान, रुग्णाची किडनीची स्थिती गंभीर असल्याने पुढील काळात किडनी प्रत्यारोपणाची आवश्यकता भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी स्वतः संपर्क साधून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. रुग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी केलेल्या या प्रयत्नांबद्दल अंकुश कचरे यांच्या नातेवाईकांनी आमदार बबनराव लोणीकर, स्वीय सहाय्यक बाबा आटोळे तसेच जिल्हा रुग्णालय प्रशासनाचे आभार मानले.

### 'स्कूल ठीक करो...

ठीक करो अभियान' देशव्यापी होत असल्याने या अभियानात सर्व स्तरातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन बोरशे गुरुजी यांनी केले. प्रत्येक गावातील नागरिकांनी आपल्या गावातील शाळेच्या समस्यांकडे लक्ष द्यावे, ग्रामसभेत शाळांच्या विकासाबाबत ठराव घ्यावेत आणि शक्य असल्यास शाळा दत्तक घेण्यासारखे उपक्रम राबवावेत, असे त्यांनी सांगितले.

शिक्षकांनीही या अभियानाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून ''आम्हाला केवळ शिकवू द्या'' या मागणीसाठी पुढाकार घ्यावा. शिक्षकांवरील अनावश्यक बिगरशैक्षणिक कामांचा भार कमी करण्यासाठी समाजाने आणि शासनाने एकत्रित भूमिका घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकार, मंत्री आणि शिक्षण विभागाने या विषयाकडे राजकीय संधी म्हणून न पाहता राष्ट्रीय जबाबदारी म्हणून पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेला आवश्यक निधी थेट उपलब्ध करून देत इमारत, स्मार्ट क्लासरूम, प्रयोगशाळा, खेळाचे मैदान आणि आवश्यक शैक्षणिक सुविधांसह सुरक्षित वातावरण निर्माण करावे, अशी मागणी त्यांनी केली. सरकारी शाळा सर्व सुविधांनी युक्त झाल्यास गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळेल, पालकांवरील लाखो रुपयांचा आर्थिक भार कमी होईल आणि मुलांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे वातावरण मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. ''शिक्षणाने कुटुंब प्रगत होते, शिक्षणाने समाज प्रगत होतो आणि शिक्षणाने देश प्रगत होतो. त्यामुळे शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने मात्र ठामपणे 'स्कूल ठीक करो' जनआंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे. शाळा सुधारली की पिढी सुधारेल आणि पिढी सुधारली की राष्ट्र घडेल,'' असा संदेश बोरशे गुरुजी यांनी दिला. यावेळी त्यांनी ''आगे बढो अभिजीत दीपके, हम तुम्हारे साथ है'' असा उल्लेख करत अभियानाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

### लिंबाचे झाड...

आहे. मिरचीचे पीक आधीच नुकसानग्रस्त झाल्याने कुटुंब आर्थिक अडचणीत होते. त्यातच शेती व कुटुंबाचा खर्च भागविण्यासाठी घेतलेल्या सावकारी कर्जाचा बोजा डोक्यावर असताना दुधाच्या उत्पन्नाचा आधार असलेली गायही गेल्याने लोखंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ''एकीकडे पीक हातचे गेले, कर्जाचा बोजा कायम आहे आणि आता घराचा चरितार्थ चालविणारी दुभती गायही दगावली. ही परिस्थिती 'दुष्काळात तेरावा महिना' अशीच आहे,'' अशी प्रतिक्रिया बोरशे गुरुजी यांनी व्यक्त केली. घटनेनंतर संबंधित ठिकाणचे जिओ-टॅग फोटो घेण्यात आले. बोरशे गुरुजी, नाना लोखंडे, देविदास लोखंडे, सुरेश लोखंडे, अमोल लोखंडे, गणेश वानखडे, संतोषराव बोरशे, गजु महाराज आदी पंचांनी घटनास्थळी पाहणी केली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे लोखंडे कुटुंबातील महिला शोकाकुल झाल्या असून, संपूर्ण कुटुंबावर दुःखाचे सावट पसरले आहे. शेतकरी कुटुंबाची बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी. घटनेचा पंचनामा करून नियमानुसार लोखंडे कुटुंबाला आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी बोरशे गुरुजी यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. दुभती गाय ही केवळ पशुधन नसून या कुटुंबाच्या रोजच्या उदरनिर्वाहाचे साधन होती. त्यामुळे शासनाने मानवी संवेदनशीलता दाखवत तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### आठवडी बाजारातील...

समजू शकलेले नाहीत. जप्त करण्यात आलेले मोबाइल कोणत्या नागरिकांचे आहेत, याची पडताळणी कदीम जालना पोलिसांकडून सुरू आहे. तसेच हे मोबाइल आठवडी बाजारातील चोरीच्या घटनांशी संबंधित आहेत का, याचा शोध घेतला जात आहे.

मोबाइल चोरीच्या घटनांमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, विधिसंघर्षित बालकाने हे मोबाइल कुठून मिळवले आणि चोरीची मालिका किती काळापासून सुरू होती, याबाबतही पोलिस तपास करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत पोहेका सचिन चौधरी, सदा राठोड, धनाजी कावळे, पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख, दिलीप गायकवाड, इम्रान खान, अजिम अन्सारी यांनी सहभाग घेतला. प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस ठाण्याकडून सुरू आहे. आठवडी बाजारात नागरिकांनी मोबाइल, पाकीट व इतर मौल्यवान वस्तूंबाबत विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### मंठ्याचे ज्येष्ठ...

राहिले. नव्या पिढीतील पत्रकार, लेखक, कलाकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. त्यांचे अनुभवाचे बोल, प्रेमळ मार्गदर्शन आणि आपुलकीचा स्वभाव यामुळे विविध क्षेत्रातील असंख्य व्यक्तींशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. मंठ्याच्या सांस्कृतिक चळवळीतील एक आधारवड, संवेदनशील मार्गदर्शक आणि समाजमनाशी नाते जोडणारे व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना त्यांच्या निधनानंतर व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे.त्यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, पत्रकारिता, साहित्य, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री राम मंदिर..

ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, केवळ मध्यस्थ असल्याचा दावा करून ई-कॉमर्स कंपन्या ग्राहकांच्या धार्मिक भावनांशी आणि विश्वासाशी खेळणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींपासून हात वर करू शकत नाहीत. ई-कॉमर्स कंपन्यांना स्वतःहून योग्य पडताळणी करावीच लागेल, हेच या निकालाने स्पष्ट केले असून ऑनलाइन बाजारपेठेत ग्राहकांचे हित जपण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल.

### माजी मुख्यमंत्री...

घुगे, जयंत कायंदे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. मृद व जलसंधारण, पर्यावरण संवर्धन तसेच जलसंधारणाच्या कार्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या वॉकेथॉनमध्ये संस्थेने उत्स्फूर्त सहभाग घेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे. समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या या यशामुळे धाकलगाव व अंबड तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### जालना जिल्ह्यात..

करण्यात येणार आहे. ही सोडत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जालना येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येणार असून संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच अर्जदार शेतकऱ्यांच्या उपस्थितीत सोडत काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातील संबंधित पात्र अर्जदार शेतकऱ्यांनी सदर सोडतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. गहीनीनाथ कपसे यांनी केले आहे.

### भारतीय ज्ञान..

महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. स्वाती महाजन, पार्वती देशमुख, डॉ.वासुदेव उगले व प्राध्यापक मंडळींनी परिश्रम घेतले.

# देशातील चार हजार पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदार गुन्हेगारीच्या खटल्यांच्या रांगेत असेल तर;देशाच्या जनतेने काय करावे?

देशातील आमदार-खासदार जर गुन्हेगारीतुन संविधानिक पदावर बसत असेल तर देशाचे पुढील भवितव्य किंवा भविष्य जेन-झीसाठी किंवा जेन-अल्फासाठी धोका निर्माण करू शकते.कारण देशातील ४००० पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदारांविरूध्द एकूण ४१९२ गुन्हेगारी प्रकरणातील खटले आजही प्रलंबित आहेत. तरीही लोकप्रतिनिधींचा बहुमान;हा तर लोकशाहीचा घोर अपमान व जेन-झीवर आणि जेन-अल्फावर घणाघाती प्रहारच म्हणावा लागेल.राजकीय पुढाऱ्यांच्या या चुकीच्या मार्गामुळे देशात कोणत्या प्रकारची लोकशाही आहे हे कळायला मार्ग नाही. देशात एकीकडे भ्रष्टाचाराचा महापूर दिसून येतो तर दुसरीकडे गुन्हेगारीचे प्रलंबित खटले यामुळे देशातील मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते;तर दुसरीकडे बेरोजगारी,महागाई,शिक्षण इत्यादी अनेक समस्यांचा मोठा डोंगर उभा आहे व त्यात भर टाकत आहे गुन्हेगारीचे खटले असणारे आमदार-खासदार हे तर लोकशाहीला काळीमा फासणारी घटना म्हणावी लागेल.कारण ज्यांना आपण लोकप्रतिनिधी समजतो आणि देशासह राज्यांचा कारभार पहातात अशा आमदार-खासदारांवर गुन्हे असतांना सरकारच्या सुरक्षेयंत्रणेखाली वावरतात व देशाच्या १४५ कोटी जनतेला ग्यान पाजतात हे कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हे तर देशाचे मुख्य कसाईच म्हणावे लागेल.कारण देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक,गंभीर व देशाला धक्का देणारी माहिती समोर आली आहे.लोकसभेतील ५४३ खासदारांपैकी २५१,तर राज्यसभेतील २३३ खासदारांपैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी प्रकरणातील खटले प्रलंबित आहेत.म्हणजे देशातील अर्धे खासदार गुन्हेगारी क्षेत्रातुन येवून दिल्लीत लोकसभेत व राज्यसभेत बसले आहेत ही कीती शर्मेची बाब म्हणावी! यावरून स्पष्ट होते की, देशात किंवा राज्यात जे काही गुन्हेगारी प्रवृत्ती दिसून येते त्याला कारणीभूत देशातील गुन्हेगार लोकप्रतिनिधीच(गुन्हेगार आमदार-खासदार) म्हणावे लागेल.त्याचप्रमाणे देशातील २८ राज्यांपैकी १४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःविरूद्ध गुन्हेगारी प्रकरणे असल्याचे जाहीर केले.तरीही ते आजही मुख्यमंत्री पदावर विराजमान आहेत ही किती लाजीरवाणी व शर्मेची गोष्ट म्हणावी.म्हणजे आपण गुन्हेगार आहोत आणि महत्वपूर्ण पदावर बसण्यालायक नाही हे माहीत असूनही महत्वाच्या पदांवर कार्यरत आहेत यावरून स्पष्ट होते की, देशातील आजी-माजी आमदार-खासदार कायदा,

स्वाभिमान,संविधान,लोकशाही, लोकांच्या वेदना व देशाचे हित बाजूला सारून महत्त्वाच्या पदांवर विराजमान आहेत ही अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब म्हणावी लागेल. भारतात लोकशाही आहे आणि लोकशाही प्रमाणे देश चालतो असे म्हटले जाते.परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक व गंभीर माहिती समोर आल्याने देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा दुखावल्या आहेत.ऑगस्ट २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अधिकृत अहवालानुसार, देशातील ३२६ खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यामध्ये लोकसभेतील ५४३ पैकी २५१ खासदार आणि राज्यसभेतील २३३ पैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी खटले आहेत.म्हणजे लोकसभेच्या ४६ टक्के खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले आहेत तर ३३ टक्के गुन्हेगारी खटले राज्यसभेच्या खासदारांवर आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोकसभेच्या २५१ पैकी १७० खासदारांवर अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे (उदा. खून, खुनाचा प्रयत्न,अपहरण आणि महिलांविरोधातील गुन्हे) दाखल आहेत तरी ते लोकप्रतिनिधी आहेत.राज्यसभेच्या बाबतीत विचार केला तर गंभीर गुन्हे असलेल्या ७५ खासदारापैकी ४० खासदारांवर ५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळाच्या शिक्षेची तरतूद असलेले गंभीर गुन्हे दाखल आहेत.

म्हणजे अर्धा देश गुन्हेगार आमदार-खासदांच्या मार्गदर्शनाखाली चालतो की काय असे चित्र दिसत आहे.महत्वाचे म्हणजे एकूण प्रलंबित खटल्यामध्ये देशातील ४००० पेक्षा अधिक आजी-माजी आमदार-खासदारांवर ४,१९२ हून अधिक फौजदारी खटले सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत.अहवालानुसार राज्यनिहाय आकडेवारीचा विचार केला तर केरळ राज्यातील सर्वाधिक म्हणजेच ९५% (२० पैकी १९) खासदारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापाठोपाठ तेलंगणामध्ये ८२% आणि ओडिशामध्ये ७६% खासदारांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे. महाराष्ट्र,उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमधील सुमारे ५०% खासदारांवर गुन्हेगारी खटले सुरू आहेत.म्हणजे देश कुठे जात आहे याचा विचार राजकीय पुढाऱ्यांनी करने गरजेचे आहे.अहवालानुसार २८ राज्यांपैकी १४ राज्यातील मुख्यमंत्र्यांवर फौजदारी खटले आहेत यात प्रामुख्याने तेलंगणाचे मुख्यमंत्री अनुमुला रेवंत रेड्डी यांच्या विरुद्ध सर्वाधिक ८९ प्रकरणे आहेत,

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुबेंदू अधिकारी यांच्या विरुद्ध २९ प्रकरणे आहेत, कर्नाटकचे मुख्यमंत्री बी.के.शिवकुमार यांच्या विरुद्ध १९ प्रकरणांची नोंद असल्याचे सांगितले जाते.अशाप्रकारे १४ राज्यांच्या वेगवेगळ्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत सर्वप्रथम गुन्हेगारी प्रकरणातील खटल्याचा निकाल जलदगतीने लावून या आमदार-खासदारांची विल्हेवाट लावून यांना ताबडतोब बर्खास्त करून यांचे पगार,पेन्शन,भत्ते रद्द केले पाहिजे व त्यांनी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा त्यांना मिळायला पाहिजे.कारण कोणताही लोकप्रतिनिधी असो त्यांच्यावर असलेले गंभीर गुन्हे देशाला व देशहिताला घातक ठरू शकते.त्यामुळे देशातील संपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदार-खासदारांच्या मुसक्या महामहीम राष्ट्रपती,सुप्रीम कोर्ट व सरकारनी कायद्याच्या मार्फत आवळल्या पाहिजे अशी या लेखाद्वारे विनंती करतो.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# इंग्रजी इलुकेशन कॉम्पिटिशन मध्ये जनजागृती विद्यालय शेवगा चे तालुकास्तरीय यश



**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी - जनजागृती माध्यमिक विद्यालय, शेवगा येथील इयत्ता आठवी ची विद्यार्थिनी कु. इरम अख्तर पठाण हिने इंग्रजी इलुकेशन कॉम्पिटिशन मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेच्या बीट स्तरावर जनजागृती माध्यमिक विद्यालय शेवगाने प्रथम क्रमांक मिळवून तालुकास्तरीय फेरीसाठी पात्रता मिळवली आहे

विद्यार्थिनीने इंग्रजी विषयातील ज्ञान, आकलन शक्ती, भाषिककौशल्य व आत्मविश्वासाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत हे यश संपादन केले आहे. विद्यार्थिनींच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत अजून एक मानाचा तूरा रोवला गेला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री प्रभाकर मामा पवार, मुख्याध्यापक श्री.मुळे सर,शिक्षकवृंद व पालकांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, तालुकास्तरीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री.गणेश मेहेत्रे सर यांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# वाघाडीच्या मुलींसाठी मानव विकास बससेवा सुरू; आमदार बबनराव लोणीकरांच्या प्रयत्नांना यश

**परतूर - प्रतिनिधी**

: तालुक्यातील वाघाडी गावातील विद्यार्थिनींसाठी गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या प्रवासाच्या प्रश्नाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. स्वातंत्र्यानंतर गावातील मुलींसाठी स्वतंत्र बससेवा उपलब्ध नसल्याने शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून वाघाडी येथील मुलींसाठी मानव विकास योजनेअंतर्गत बससेवा सुरू करण्यात आली आहे.

बससेवा सुरू झाल्यानंतर वाघाडी ग्रामस्थांनी बसचे भव्य व उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी ग्रामस्थांनी विद्यार्थिनींचेही स्वागत करून त्यांना बसमधून शाळेत रवाना केले. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मुलींच्या सुरक्षित व सुलभ प्रवासाची मागणी पूर्ण झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाडी गावातील मुलींना शिक्षणासाठी बाहेरच्या गावात जावे लागते. मात्र, नियमित बससेवा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या शिक्षणावरही परिणाम होण्याची शक्यता होती. अनेक विद्यार्थिनींना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. आर्थिकदृष्ट्या हा खर्च पालकांवर अतिरिक्त भार टाकणारा होता. त्यामुळे गावातील मुलींसाठी मानव विकास बस सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात होती.

या मागणीसाठी भाऊसाहेब दादा टेहळे, नाथा अर्जुन, रामकिसन तात्या टेहळे, भीमराव बाबासाहेब टेहळे, लक्ष्मण माने, गोविंद टेहळे, अंकुश शंभूदेव टेहळे यांच्यासह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. त्यांनी विद्यार्थिनींच्या अडचणी प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देत बससेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. आमदार बबनराव लोणीकर यांनीही या मागणीची दखल घेत विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा आणि सुरक्षित प्रवासाचा विचार करून मानव विकास बससेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अखेर वाघाडी गावातील मुलींसाठी बससेवा उपलब्ध झाली आहे. बस सुरू झाल्याने विद्यार्थिनींना आता शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी सुरक्षित आणि नियमित प्रवासाची सुविधा मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी ही बससेवा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

बससेवा सुरू झाल्याबद्दल वाघाडी गावातील सर्व विद्यार्थिनींनी आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानले. तसेच बससेवेसाठी पाठपुरावा करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचेही विद्यार्थिनींनी आभार व्यक्त केले.

''मुलींच्या शिक्षणासाठी सुरू झालेली ही बससेवा आमच्यासाठी मोठा दिलासा असून यामुळे शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे,'' अशी भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली.

वाघाडी गावातील मुलींच्या शिक्षणासाठी सुरू झालेली ही मानव विकास बससेवा केवळ प्रवासाची सुविधा नसून ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. त्यामुळे या बससेवेचे ग्रामस्थ आणि विद्यार्थिनींकडून स्वागत करण्यात आले.

# जांबतांडा साठवण तलावासाठी प्रशासनाकडून हालचाली; शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत स्थळ पाहणी

**जालना – प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील मौजे जांबसमर्थ येथील जांबतांडा साठवण तलाव प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. प्रकल्पासंदर्भात शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या जमिनीच्या संपादनाबाबत चर्चा करण्याबरोबरच दि.१८ ऑगस्ट रोजी प्रकल्पस्थळाची सविस्तर तांत्रिक पाहणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या सहमतीने प्रकल्प पुढे नेण्यासाठी प्रशासन सकारात्मक आहे.

जांबतांडा साठवण तलाव प्रकल्पासंदर्भात मृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे ५ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष आढावा बैठक घेण्यात आली होती. सदर प्रकल्प प्रचलित निकष व मापदंडांमध्ये बसत नसल्याने तो रद्द करण्याबाबत शासनाकडे प्रस्तावित होता. मात्र, बैठकीदरम्यान मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिलेल्या निर्देशानुसार या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे निश्चित करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीचे किमान मूल्यांकन निश्चित करून संबंधित शेतकऱ्यांसोबत खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी



पद्धतीने जमीन उपलब्ध करून घेण्याबाबत चर्चा करण्याचे तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी व निरीक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार दि . १८ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत घनसावंगी तालुक्यातील मौजे जांबसमर्थ येथील जांबतांडा साठवण तलाव प्रकल्प पाहणी दौरा पार पडला. यावेळी मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक अभियंता, मृद व जलसंधारण मंडळ, छत्रपती संभाजीनगर, कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, जालना, उपविभागीय अधिकारी तसेच भूसंपादन अधिकारी, तहसीलदार, घनसावंगी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी अधिकाऱ्यांनी प्रकल्पस्थळाची सविस्तर तांत्रिक पाहणी केली. तसेच उपस्थित लाभधारक शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून जमीन खरेदी, मोबदला आणि प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा केली. शेतकऱ्यांच्या भूमिकेचा आणि त्यांच्या सहमतीचा विचार करून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया राबविण्याबाबत यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

जांबतांडा साठवण तलाव प्रकल्पामुळे परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे प्रकल्प रद्द होण्याऐवजी विशेष बाब म्हणून त्याला मान्यता मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. जमीन उपलब्धतेचा प्रश्न शेतकऱ्यांशी संवाद व थेट वाटाघाटीतून सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. या पाहणी दौऱ्यास विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ आणि लाभधारक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक दृष्टिकोन

कोणताही समाज किती सुसंस्कृत आहे, हे त्या समाजातील वृद्ध आणि बालकांना कशी वागणूक मिळते यावरून ठरते. आज आपले राष्ट्र तांत्रिक आणि आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगती करत असले, तरी समाजात ज्येष्ठ नागरिकांकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन मात्र कमालीचा उदासीन आणि चिंताजनक बनत चालला आहे. ज्या पिढीने आपले उभं आयुष्य देशाच्या, समाजाच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या उभारणीसाठी वेचले, तीच पिढी आज आयुष्याच्या उत्तरार्धात हक्काच्या पेन्शनसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करत आहे. कर्मचारी पेन्शन योजना १९९५ म्हणजेच ईपीएस-९५ (-९५) अंतर्गत निवृत्त झालेल्या लाखो वृद्धांचा लढा हा केवळ आर्थिक मागणीपुरता मर्यादित नसून, तो त्यांच्या स्वाभिमानाचा आणि अस्तित्वाचा लढा बनला आहे. ईपीएस-९५ चा लढा हा हक्काच्या पैशांसाठी असूनही वणवण होत आहे. खासगी आणि संघटित क्षेत्रातील कामगारांना निवृत्तीनंतर हक्काचे आर्थिक छत्र मिळावे म्हणून ईपीएस-९५ योजना सुरू करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या पगारातून कपात करून हा निधी जमा करण्यात आला. मात्र, आजची वस्तुस्थिती अत्यंत भीषण आहे. या योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपये सरकारकडे जमा असूनही, आज अनेक वृद्धांना महिनाकाठी केवळ ५०० ते १,००० रुपये इतकी तुटपुंजि पेन्शन मिळत आहे.आजच्या महागाईच्या काळात १,००० रुपयांमध्ये एका व्यक्तीच्या महिनाभराच्या औषधांचा खर्चही निघू शकत नाही, तिथे जगण्याचा खर्च कसा भागणार? राष्ट्रीय संघर्ष समितीच्या () माध्यमातून ज्येष्ठ नागरिक किमान पेन्शन ७,५०० रुपये अधिक महागाई भत्ता मिळावा म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून देशपातळीवर तीव्र आंदोलन करत आहेत. नुकतेच ऑगस्ट २०२६ मध्येही संसदेच्या अधिवेशनादरम्यान यावर प्रश्न उपस्थित करण्यात आले, मात्र सरकारने अद्याप कोणतीही ठोस वेतनवाढ जाहीर केलेली नाही. आपल्या हक्काच्या पैशांसाठी ८०-८५ वर्षांच्या वृद्धांना दिल्लीच्या जंतरमंतरवर भर उन्हात, पावसात आंदोलने करावी लागणे, ही भारतीय लोकशाही आणि सामाजिक व्यवस्थेची शोकांतिका आहे.

सामाजिक दृष्टिकोनातील बदल आणि ज्येष्ठांची अवहेलना- आज समाजात संयुक्त




कुटुंब पद्धती वेगाने लयाला जाऊन विभक्त कुटुंब पद्धती पाय रोवत आहे. या बदलत्या रचनेत ज्येष्ठ नागरिकांचे स्थान दुय्यम दर्जाचे झाले आहे. जोपर्यंत माणूस कमावता असतो, तोपर्यंत त्याला समाजात आणि कुटुंबात प्रतिष्ठा असते; परंतु निवृत्तीनंतर, विशेषतः आर्थिक परावलंबित्व आल्यानंतर, त्याच व्यक्तीला ओझे मानले जाते.ईपीएस-९५ पेन्शनधारकांची अवहेलना अनेक स्तरांवर होत आहे. कौटुंबिक स्तरावर उपेक्षा- पुरेशी पेन्शन नसल्यामुळे या वृद्धांना वैद्यकीय उपचारांसाठी किंवा दैनंदिन गरजांसाठी मुलांवर किंवा नातेवाईकांवर अवलंबून राहावे लागते. आर्थिक सक्षमता नसल्याने अनेक कुटुंबांमध्ये त्यांना मानहानीकारक वागणूक दिली जाते, अनेकदा त्यांना घरात एका कोपऱ्यात किंवा थेट वृद्धाश्रमाची वाट दाखवली जाते.शासकीय आणि संस्थात्मक पातळीवरील उदासीनता- बँकेत किंवा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या () कार्यालयात चकरा मारताना या वृद्धांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागते. दरवर्षी डिजिटल जीवन प्रमाणपत्र ( ) सादर करताना तांत्रिक अडचणींमुळे अनेक ज्येष्ठांची पेन्शन अचानक थांबते, ज्यामुळे त्यांना प्रचंड मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागतो.सामाजिक दुर्लक्ष- समाज म्हणून आपण वृद्धांच्या अनुभवाचा आदर करणे विसरलो आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, रुग्णालये किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी त्यांच्यासाठी असलेल्या राखीव जागा किंवा सवलती देतानाही तरुणांकडून नाकं मुरडली जातात. त्यांची थट्टा केली जाते, जी त्यांच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवणारी असते.

अपेक्षित बदल- सहानुभूती नव्हे, हक्क हवा. वृद्धापकाळ ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, जी आज ना उद्या प्रत्येकाच्या आयुष्यात येणार आहे. आजच्या तरुण पिढीने हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, आज जे ज्येष्ठ नागरिक आपल्या हक्कासाठी लढत आहेत, कालपर्यंत त्यांनीच देशाच्या अर्थव्यवस्थेला गती दिली होती. ज्येष्ठ नागरिकांना समाजाकडून केवळ कोरडी सहानुभूती किंवा दया नको आहे, तर त्यांना त्यांचा हक्क आणि आदरयुक्त जीवन हवे आहे.

सरकारने केवळ निधीची कमतरता किंवा भविष्यातील दायित्व अशी तांत्रिक कारणे पुढे न करता, मानवी दृष्टिकोनातून ईपीएस-९५ च्या पेन्शनधारकांच्या मागण्यांचा तातडीने विचार केला पाहिजे. एका बाजूला सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या भरघोस पेन्शन तर दुसऱ्या बाजूला देशाच्या उभारणीत घाम गाळणाऱ्या कामगारांना मिळणारी १,००० रुपयांची पेन्शन, ही दरी मिटवणे अत्यंत आवश्यक आहे. एकात्मिक समाजाची गरज- ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक आणि अनुभवांचे चालते-बोलते विद्यापीठ असतात. त्यांचा लढा हा केवळ पैशांचा नसून निवृत्तीनंतर सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा आहे. जोपर्यंत शासन आणि समाज या दोन्ही स्तरांवर वृद्धांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कृतज्ञतेचा आणि आदराचा होत नाही.

तोपर्यंत आपण एक प्रगतीशील समाज म्हणून अपयशी ठरत राहू. ईपीएस-९५ च्या वृद्धांना त्यांच्या हक्काची पेन्शन मिळवून देणे आणि त्यांना प्रत्येक ठिकाणी होणाऱ्या अवहेलने पासून वाचवणे, हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या या लढ्यात त्यांना सन्मानाची साथ देवून संवेदनशील समाज घडवू या.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# 'स्कूल ठीक करो' अभियान आता जनआंदोलन झाले पाहिजे; बोरशे गुरुजींचे आवाहन

## भोकरदन तालुक्यात ७६ शाळांची पाहणी करून समस्यांचा घेतला आढावा; शाळा सुधारल्या तरच पिढी आणि राष्ट्र घडेल

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

''शिक्षणाशिवाय राष्ट्र घडत नाही, समाज प्रगत होत नाही आणि तरुणांचे भविष्यही सुरक्षित होत नाही. त्यामुळे सरकारी आणि जिल्हा परिषद शाळांची स्थिती सुधारण्यासाठी सुरू असलेले 'स्कूल ठीक करो अभियान' आता केवळ अभियान न राहता जनआंदोलन झाले पाहिजे,'' असे आवाहन बोरशे गुरुजी यांनी केले.

सरकारी शाळांच्या स्थितीचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी



शिक्षणाच्या वाढत्या व्यापारीकरणावरही चिंता व्यक्त केली. नर्सरीपासूनच मोठ्या प्रमाणावर शुल्क आकारले जात असल्याने सर्वसामान्य, शेतकरी, गरीब आणि मजूर कुटुंबांवर शिक्षणाचा आर्थिक भार वाढत आहे. अशा परिस्थितीत सरकारी शाळा दर्जेदार आणि सर्व सुविधांनी युक्त करणे हाच प्रभावी पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले.

''बोलणे सोपे आहे; मात्र प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी आम्ही शाळांमध्ये गेलो,'' असे सांगत बोरशे गुरुजी यांनी मागील वर्षी आम आदमी पार्टीच्या वतीने करण्यात आलेल्या राज्यव्यापी शाळा पाहणी अभियानाचा उल्लेख केला.

आपल्या भोकरदन टीमसह भोकरदन तालुक्यातील ७६ शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्याचे त्यांनी सांगितले. या पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी पडलेल्या किंवा जीर्ण खोल्या, पिण्याच्या पाण्याची समस्या, अस्वच्छ स्वच्छतागृहे, खेळाच्या मैदानाचा अभाव, शैक्षणिक गुणवत्तेतील अडचणी तसेच शिक्षकांवरील बिगरशैक्षणिक कामांचा बोजा अशा समस्या निदर्शनास आल्याचा दावा त्यांनी केला.

या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी गट शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर 'झोपा काढो आंदोलन' करण्यात आले. आंदोलनानंतर काही शाळांना निधी मिळाला आणि काही ठिकाणी दुरुस्तीची कामे झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे लोकशाही मार्गाने केलेल्या आंदोलनातून प्रशासनावर दबाव निर्माण करून बदल घडवून आणता येतो, असा दावा त्यांनी केला. 'स्कूल (पान २ वर)

# लिंबाचे झाड अंगावर पडून दुभती गाय ठार; शेतकरी कुटुंबावर संकट

## तातडीने नुकसानभरपाई देण्याची बोरशे गुरुजींची मागणी

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

आधीच मिरचीचे पीक हातचे गेल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या गरीब शेतकरी कुटुंबावर आणखी एक संकट कोसळले आहे. तालुक्यातील करजगाव येथील शेतकरी गंजीधर नानाभाऊ लोखंडे यांच्या शेतातील मोठे लिंबाचे झाड अचानक पडल्याने त्याखाली सापडून दुभती गाय जागीच ठार झाली. या घटनेत अंदाजे १ ते १.५ लाख रुपयांचे



नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

आज दुपारी ही घटना घडली. लोखंडे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी दुधाचे उत्पन्न महत्त्वाचे होते. मात्र, अचानक घडलेल्या या दुर्घटनेत दुभती गाय दगावल्याने कुटुंबाचा उत्पन्नाचा आधारच हिरावला गेला (पान २ वर)

# जालना जिल्ह्यात परदेश अभ्यास दौऱ्यासाठी शेतकऱ्यांची सोडत पद्धतीने निवड

**जालना - प्रतिनिधी**

राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत जालना जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याची संधी मिळणार असून, या अभ्यास दौऱ्यासाठी पात्र अर्जदारांची सोडत पद्धतीने निवड करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांसाठी सन २०२६-२७ या वर्षात 'राज्य पुरस्कृत योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना परदेशातील आधुनिक कृषी तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया, बाजार व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, कृषी यांत्रिकीकरण तसेच विविध कृषी विषयक तांत्रिक बाबींचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यासाठी या योजनेंतर्गत एकूण ५ शेतकऱ्यांची लक्षांकित निवड करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांकडून १४ ऑगस्ट, २०२६ रोजी पर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जांची मार्गदर्शक सूचनांनुसार छाननी करण्यात आली असून, जालना जिल्ह्यात प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या निर्धारित लक्षांकापेक्षा अधिक असल्याने पात्र लाभार्थ्यांची निवड सोडत पद्धतीने (पान २ वर)

# आठवडी बाजारातील गर्दीचा फायदा घेत मोबाइल चोरी; विधिसंघर्षित बालक ताब्यात, १२ मोबाइल जप्त

## कदीम जालना पोलिसांची कारवाई; जप्त मोबाइल कोणाचे, पडताळणी सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील रविवारच्या आठवडी बाजारातील गर्दीचा फायदा घेत नागरिकांच्या खिशातून मोबाइल चोरी करणाऱ्या एका विधिसंघर्षित बालकास कदीम जालना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून विविध कंपन्यांचे तब्बल १२ मोबाइल फोन जप्त केले असून, या मोबाइलचा चोरीच्या घटनांशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे.

गेल्या काही महिन्यांपासून रविवारच्या आठवडी बाजारात मोठी गर्दी होत असून, या गर्दीचा फायदा घेत नागरिकांचे



मोबाइल चोरीला जाण्याच्या घटना घडत होत्या. या प्रकाराची गंभीर दखल कदीम जालना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी जनार्धन शेवाळे यांनी घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला.

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नूतन वसाहत, जुना जालना परिसरातून एका विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेतले. त्याची चौकशी केल्यानंतर त्याच्याकडून विविध कंपन्यांचे १२ मोबाइल फोन जप्त करण्यात आले.

पोलिसांच्या नोंदीनुसार, कदीम जालना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अ.गु.र.नं. ५५५/२०२६, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ अंतर्गत कारवाईत ११ मोबाइल फोन जप्त करण्यात आले असून त्यांची अंदाजे किंमत २ लाख ६० हजार रुपये आहे. याशिवाय आणखी एक मोबाइल जप्त करण्यात आल्याने एकूण १२ मोबाइल पोलिसांच्या ताब्यात आहेत.

जप्त मोबाइलमध्ये विवो, ओपो, सॅमसंग, रेडमी, पोको आणि मोटोरोला या कंपन्यांच्या मोबाइलचा समावेश आहे. काही मोबाइलचे क्रमांक उपलब्ध असून, तीन मोबाइलचे क्रमांक (पान २ वर)

# मंठ्याचे ज्येष्ठ पत्रकार, नाट्यकर्मी व मार्गदर्शक बाबासाहेब उर्फ बाबाकाका कुलकर्णी यांचे निधन

**मंठा- प्रतिनिधी**

मंठा येथील ज्येष्ठ पत्रकार, नाट्यकर्मी, लेखक, ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तसेच सर्वांचे जिव्हाळ्याचे मार्गदर्शक बाबासाहेब उर्फ बाबाकाका कुलकर्णी यांचे वयाच्या ७८व्या वर्षी शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मंठ्याच्या सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक आणि पत्रकारिता क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.बाबाकाका कुलकर्णी यांनी पत्रकारिता, नाट्यकला, लेखन आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजजीवनात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. आपल्या बहुआयामी



व्यक्तिमत्त्वाने त्यांनी अनेक पिढ्यांना मार्गदर्शन व दिशा दिली. साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीचा जिव्हाळा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये होती. वयाने ज्येष्ठ असूनही विचारांनी ते सदैव तरुण (पान २ वर)

# श्री राम मंदिर अयोध्या प्रसादच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीप्रकरणी ॲमेझॉनला १ लाख रुपयांचा दंड

**जालना - प्रतिनिधी**

ई-कॉमर्स क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲमेझॉन सेलर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडला आपल्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर श्री राम मंदिर अयोध्या प्रसाद या दिशाभूल करणाऱ्या दाव्याखाली मिठाई विकण्याची मुभा दिल्याप्रकरणी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने () एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. संबंधित धार्मिक संस्थांच्या अधिकृत पडताळणी कागदपत्रांशिवाय अशा उत्पादनांची कोणतीही जाहिरात, नोंदणी किंवा विक्री करण्यावर प्राधिकरणाने पूर्णपणे निर्बंध लादले असून, १५ दिवसांच्या आत दंडाची रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. हे संपूर्ण प्रकरण जानेवारी २०२४ मधील अयोध्या येथील ऐतिहासिक प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू झाले होते. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सने () १९ जानेवारी २०२४ रोजी याविरोधात तक्रार दाखल केली होती. ॲमेझॉनवर व्यावसायिक मिठाईचे उत्पादन श्री राम मंदिर अयोध्या प्रसाद या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या लेबलखाली विकले जात असल्याचे तक्रारीत म्हटले होते. श्री राम जन्मभूमी मंदिराशी कोणताही अधिकृत संबंध अथवा परवानगी नसतानाही धार्मिक प्रतिमा व घोषवाक्यांचा वापर करून देशभरातील भाविकांच्या धार्मिक भावनांचा व्यावसायिक फायद्यासाठी गैरवापर केला जात असल्याचा ठपका प्राधिकरणाने ठेवला. कारवाईदरम्यान ॲमेझॉनने माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ७९ अंतर्गत केवळ डिजिटल मध्यस्थ (इंटरमीडियरी) असल्याचे सांगत जबाबदारीतून मुक्त होण्याचा युक्तिवाद केला होता. मात्र, ग्राहक संरक्षण (ई-कॉमर्स) नियम २०२० हे ई-कॉमर्स कंपन्यांवर थेट ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी सोपवतात, असे नमूद करत प्राधिकरणाने हा बचाव फेटाळून लावला. दोन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या सुनावणीनंतर ग्राहक संरक्षण कायदा २०१९ च्या कलम २१(४) चे उल्लंघन केल्याप्रकरणी कंपनीला दोषी धरण्यात आले. भविष्यातील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्राधिकरणाने ॲमेझॉनला कडक मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार राम मंदिरासह देशातील प्रमुख १० तीर्थक्षेत्रांच्या नावावर प्रसाद, महाप्रसाद किंवा भोग या स्वरूपात कोणतीही उत्पादने अधिकृत पुराव्याशिवाय विकण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच प्लॅटफॉर्मवर विक्रेत्याचे नाव, पूर्ण पत्ता आणि ग्राहक तक्रार निवारण अधिकाऱ्यांची माहिती स्पष्टपणे दर्शविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना ग्राहक हक्क वकील (पान २ वर)

# माजी मुख्यमंत्री सुधाकररावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट जलसंधारण दिवस म्हणून साजरा

## महा वॉकेथॉन २०२६ मध्ये समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा प्रथम क्रमांक

**जालना - प्रतिनिधी**

मृद व जलसंधारण विभाग, जालना यांच्या वतीने जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या महा वॉकेथॉन २०२६ स्पर्धेत अंबड तालुक्यातील समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, धाकलगाव यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदवत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

संस्थेला प्रथम क्रमांकासाठी रोख ११,००० रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. हे पारितोषिक जिल्हाधिकारी मा. सौ. अशीमा





मित्तल महापौर वंदनाताई मगरे मृद व जलसंधारण कार्यकारी अभियंता मृद व जलसंधारण विभाग उपकार्यकारी अभियंता जिल्हा परिषद मृद व जलसंधारण विभाग कार्यकारी अभियंता सलगर मॅडम यांच्या हस्ते संस्थेचे कोषाध्यक्ष राजू भाऊराव राठोड यांनी स्वीकारले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गजानन पालवे, सचिव सतीश मुसळे, तसेच संस्थेचे राम खाडे,विक्रम चव्हाण, किरण सातव, राहुल डोईफोडे, मंगेश (पान २ वर)

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी ईद-ए- मिलाद, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी रक्षा बंधन, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीकृष्ण जयंती, तसेच दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी गोपाळकाला (दहिहंडी) इत्यादी सण उत्सव साजरे होणार आहेत. या सण, उत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यात व शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये विविध समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांच्या तसेच आरक्षण बचावच्या दृष्टीने तसेच शेतक-यांचे विविध मागणीसाठी उपोषणे आंदोलने,मोर्चे, धरणे इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम सुरु आहेत. या मागण्यांच्या दृष्टीने भविष्यातही विविध स्वरुपाची आंदोलने, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी कार्यक्रम आयोजित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.

तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही.

हा आदेश संपुर्ण जिल्हासाठी दि.२३.८.२०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ६.९.२०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# भारतीय ज्ञान परंपरा कीर्तनामुळे तळागाळापर्यंत पोहचली - डॉ. कदम

**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी - भारत या शब्दामध्ये भा शब्दाचा अर्थ ज्ञानप्रभा आणि त्यात रत म्हणजे रममाण होणे तो भारत होय. सतत ज्ञानात रममाण होणारा देश म्हणजे भारत, या देशात सर्वोच्च ज्ञानाची मोठी परंपरा आहे त्यामुळे जीवन समृद्ध करण्यासाठी आवश्यक सर्व ज्ञान वेदादी ग्रंथातून मांडून ठेवले आहे. मात्र त्यावर आज विपुल संशोधन होणे आवश्यक आहे. तेच वैदिक ज्ञान संत परंपरेतील साहित्यात उतरले आहे व ते कीर्तनकारांनी तळागाळापर्यंत पोहचवले आहे व आजही पोहचावीत आहेत असे प्रतिपादन भारतीय ज्ञान परंपरा व समृद्ध कीर्तन परंपरा या विषयावर आयोजित एक दिवसीय चर्चासत्रात बीजभाषण करताना डॉ न.ब.कदम यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ अश्विन



रांजणीकर होते तर या चर्चासत्राचे उद्घाटन आनंदगड येथील हभप डॉ भगवान बाबांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थिती श्रीमती दानकुवर हिंदी कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष मा. महेंद्रकुमारजी गुप्ता, सहसचिव नरेशजी अग्रवाल, कोषाध्यक्ष संजयजी अग्रवाल, संचालक अजय जी अग्रवाल, प्रशासकीय अधिकारी डॉ. विद्या पटवारी, प्र.प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ जितेंद्र अहिरराव यांनी केले. या सत्राचे सूत्रसंचालन हभप झगरे गुरूजी वाकदकर यांनी केले तर आभार डॉ वासुदेव उगले यांनी मानले.

आषाढी एकादशीनिमित्त जालना जिल्ह्यातून पंढरपूरला जाणारी एक शिस्तबद्ध वारी हभप सोनवणे गुरुजींच्या नेतृत्वाखाली दरवर्षी निघत असते यावर्षी शासनाने दखल घेऊन या दिंडीला स्वच्छतेची उत्कृष्ट दिंडी म्हणून द्वितीय पारितोषिक दिले आहे हा जालना जिल्ह्याचा गौरव असून या चर्चासत्रात सोनुने गुरुजींचा भव्य सत्कार हभप डॉ भगवान बाबा आनंदगडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

दुपारच्या सत्रामध्ये '' किर्तन परंपरा वर्तमान काळातील प्रभाव उपयुक्तता व बदलते स्वरूप'' या विषयावर चर्चासत्र झाले असून या चर्चासत्राचे अध्यक्ष ह भ प डॉ अनिरुद्ध महाराज क्षीरसागर हे होते. सर्वोच्च उपनिषदांचे तत्त्वज्ञान संतसाहित्यात आले असून कीर्तनकारांनी त्या ग्रंथांचा अभ्यास करून कीर्तन केले पाहिजे असे मत व्यक्त केले. या चर्चासत्रात डॉ राम रौनेकर, डॉ अशोक देशमाने, डॉ प्रमोद कुमावत, डॉ ऋषीबाबा शिंदे यांनी विषयाला धरून आपले मत व्यक्त केले. या सत्राचे सूत्रसंचालन हभप नारायण महाराज पिंपळे यांनी केले तर कार्यक्रमाच्या आरंभी प्रा रामेश्वर नरवडे, पांडुरंग महाराज वाघमारे यांनी भजन सादर केले तर समारोपामध्ये प्रशांत जाधव व भक्तीताई रणनवरे यांच्या सुश्राव्य पसायदानाने सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाला जालना जिल्ह्यातून मान्यवर कीर्तनकार, प्रवचनकार मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती दानकुवर महिला (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.